महावितरण

# जाहीर सूचना

आय.टी.आय. शिकाऊ उमेदवार म्हणुन भरती प्रकियेची (२०१८-२०१९) करीता महावितरण चंद्रपूर मंडल कार्यालय अंतर्गत चंद्रपूर/वरोरा/बल्लारशा विभाग यांच्या आस्थापनेवरील विजतंत्री/तारतंत्री/कोपा (COPA) या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकूण १२५ जागा भरण्यासाठी **१७.१२.२०१८ ते ३०.१२.२०१८ पर्यंत सायं. ०५.३० वाजेपर्यंत** **http://www.apprenticeship.gov.in** या संकेत स्थळावर चंद्रपूर मंडला अंतर्गत खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहेत. पदाचा ट्रेड हा Electrician/Wireman/COPA करीता शिकाऊ उमेदवाराचा कालावधी हा १ वर्षाकरीता असुन जागा खालील प्रमाणे आहेत.

| विभागाचे नांव | रजिस्ट्रेशन क्रमांक | व्यवसाय (Tread) | | | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|
| | | विजतंत्री (Electrical) | तारतंत्री (Wireman) | कोपा (COPA) | |
| चंद्रपूर | E03172701973 | २५ | १५ | ११ | ५१ |
| वरोरा | E04172702364 | २० | १० | ६ | ३६ |
| बल्लारशा | E03172702034 | २० | १० | ८ | ३८ |
| | | **६५** | **३५** | **२५** | **१२५** |

१) **शैक्षणीक अर्हता :-** महाराष्ट्र राज्य शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री/तारतंत्री/कोपा या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) **वयोमर्यादा :-** १८ ते ३३ वर्ष मागासवर्गीयासाठी ०५ वर्षे शिथिलक्षम.

www.fjs.co.in

३) **विद्यावेतन :-** नियमाप्रमाणे लागु राहील.

४) पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५) एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्राची प्रत आधारकार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी.

६) आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत (चार सेमिस्टर गुणपत्रिका).

७) उमेदवाराने मागास प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत असणे आवश्यक आहे.

८) भरती प्रकिये दरम्यान उमेदवाराने राजकिय किंवा इतर अधिकाऱ्याकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी, तसेच उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक आहे.

१०) वरील कालावधीत अर्ज सादर न केल्यास त्यानंतरच्या कालावधीच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) प्रणालीमध्ये बदल झाल्यामुळे या आधी ज्या उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे/नोंदणी करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१२) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले स्वत:चा E-mail Id नोंदविणे आवश्यक राहील.

१३) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांची टक्केवारी (Merit List) नुसार व प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल याची नोंद घ्यावी.

**(पी.आर.ओ. चंद्रपूर नं. २०३ दि.१५.१२.२०१८)** **अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. सं.व सु. मंडल, चंद्रपूर**